मेहुण्याचा दाजीला अडीच कोटीला गंडा

'इक्विटी'च्या आमिषाने पैसे उकळले; एमपीआयडीन्वये गुन्हा

नाशिक। प्रतिनिधी

बांधकाम व्यावसायिक असलेल्या भावाच्या ओळखीतून चुलतबहिणीचा विवाह जुळवत असतांना नवरदेवाच्या वडिलांनी 'मुलगा मल्टिनॅशनल कंपनीत एक कोटी रुपयांचे पॅकेज कमवितो' असे सांगितले. मुलाच्या कंपनीसह डायरेक्टरकडे गुंतवणूक केल्यास ८० कोटी रुपयांची इक्विटी मिळेल, असे आमिष दाखवून संशयित नवरदेव अर्थात मेहुण्याने बांधकाम व्यावसायिक दाजीला अडीच कोटी रुपयांचा गंडा घातला आहे.

याबाबत इंदिरानगर येथील बेळे गार्डनजवळ राहणारे रवींद्र माश्ती फड यांनी इंदिरानगर पोलिसांत फिर्याद नोंदविली आहे. विशेष म्हणजे फसवणुकीसह महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम(एमपीआयडी) कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सचिन सुरेश साळुंखे, श्वेता सचिन साळुंखे, कबीर आव्हाड उर्फ मयूर सुहास आव्हाड व त्याचे वडील सुहास धोंडीबा आव्हाड (सर्व रा. २४ के. ओपुला, पिंपळेगुरव, पिंपरी चिंचवड) अशी संशयितांची नावे आहेत. रवींद्र फड यांचे चुलते शिवाजी फड यांची मुलगी रुचिका शिवाजी फड उर्फ रुचिका मयूर आव्हाड हिचा विवाह करण्यासाठी ते स्थळ बघत असतांना नवरदेवाच्या वडिलांनी संशयित सुहास याने रविंद्र यांचे वडील माश्ती यांना ४ जानेवारी २०२४ रोजी संपर्क केला. तेव्हा सुहास याने मुलगा मयूर उर्फ कबीर आव्हाड हा पुणे येथील ब्लॅक हॅट सिंडीकस कंपनीत डायरेक्टर असून त्याला १ कोटी रुपयांचे पॅकेज आहे. कंपनीने त्याला १०० ते ३०० कोटी रुपयांची इक्विटी दिली आहे व सचिन साळुंखे आणि त्यांच्या पत्नी श्वेता या ब्लॅक हॅट सिंडीकस व मे. ग्लोकल फूड वर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालक आहेत असे सांगितले. तेव्हा रुचिका व कबीर यांचा विवाह ठरल्यानंतर लेखानगर येथील हॉटेल ग्रँड रिओ येथे साखरपुड्यासाठी कबीरच्या कंपनीचे संचालक सचिन साळुंखे व त्याची पत्नी आली. तेव्हा संशयितांनी कंपनीच्या पॅन इंडिया व ग्लोबल फ्रॅन्चाईसी मिळवून देऊ असे रवींद्र यांना सांगितले. तेव्हा सचिन साळुंखे व श्वेता यांनी कंपनीच्या फ्रॅन्चाईसाठी रवींद्र यांना दहा कोटी रूपये भरावे लागतील, असे सांगून प्रवृत्त केले. तसेच सोपा पर्याय सांगून किमान १. ५ कोटी रुपये दरवर्ष भरून उरलेली रक्कम फ्रॅन्चाईसी ताब्यात देऊ तेव्हा ती अदा करा, असे सांगितले. तेव्हा संशयितांनी संगनमताने रवींद्र यांना 'इन्व्हेस्ट' करुन परतावा व ८० कोटी रुपयांची इक्विटीचे आमिष दाखवले. तसेच एका इंग्रजी वृत्तपत्रातील सन २०२३ मधील बातमी व त्यात कंपनीकडे १३०० कोटी रुपयांची इक्विटी असल्याचे सांगून यूट्यूबवर कंपनीचे काही व्हिडिओ दाखवून विश्वास संपादन केला. यानंतर, रवींद्र यांनी टप्प्याटप्प्याने सुहास यांच्यासह इतर बँक खात्यांत दोन कोटी १५ लाख रुपये वर्ग केले.

सव्वा कोटी परत

गुंतवणूक केल्याची शाश्वती म्हणून रवींद्र यांनी कायदेशीर करारनाम्याची मागणी केली असता संशयितांनी आवश्यकता नसल्याचे सांगितले. दरम्यान, वेळोवेळी फ्रॅन्चाईसीची मागणी केली असता, संशयितांनी उडवाउडवाची उत्तरे दिली. यानंतर, रवींद्र यांनी तगादा लावला असता त्यांना गुंडांची व ठार मारण्याची धमकी दिली. त्याचवेळी रवींद्र यांनी कायदेशीर कारवाई करतो, असे सांगितल्यावर संशयितांनी एक कोटी ७५ लाख रुपये त्यांना परत केले. मात्र, उर्वरित पन्नास लाख रुपये देण्यास नकार दिला आहे व आता श्वेता व सचिन साळुंखे यांनी मोबाईल नंबर ब्लॅकलिस्ट केला आहे.

तपास पथक पिंपरी चिंचवडला जाणार

वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या सूचनेने गुन्हा दाखल झाला असून तपास उपनिरीक्षक बी. डी. सोनार तपास करत आहेत. दरम्यान, या प्रकरणात संशयितांनी अनेकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा संशय असून तपास पथक पिंपरी चिंचवड येथे जाऊन तपास करणार आहे. तसेच, संशयितांच्या सर्वच कंपन्या बनावट निघल्याचे समोर आले आहे.

सूर विश्वासची मैफल रंगली

नाशिक । प्रतिनिधी

तरल स्वरांचे माधुर्य, स्वरांची लय व उपजत अभिजात स्वर यांचे गोंदण घेऊन सूर विश्वासची मैफल उत्तम रंगली. वातून ईश्वरभक्तीची आस उपस्थितांनी अनुभवली.

'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीत भक्ती नांदुर्डीकर यांचे शास्त्रीय गायन संपन्न झाले. वैणवी भडकमकर, (तबला), अभिजीत भटजिरे (संवादिनी) यांची त्यांना साथसंगत केली. तर सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

मैफिलीचे हे ४९ वे पुष्प होते. विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक तर संकल्पना विनायक रानडे यांची होती. प्रभावी सादरीकरण रसिकांना अनुभवायला मिळाले. बडाख्यालपासून ते अभंगपर्यंतच्या रचनांनी श्रोत्यांना भक्तिरस, सौंदर्य आणि अध्यात्माच्या गुंफणीत गुंतवून ठेवले.

मैफलीची सुरुवात 'हो करतार' या बडाख्याल रचनेने झाली. या बंदिशीच्या गंभीर आणि रसपूर्ण राग अहिर भैरवच्या गहिऱ्या स्वरांनी समर्पक साथ दिली.

डॉक्टरांच्या निष्काळजीने बालिकेचा मृत्यू

अंबड पोलिसांकडून गुन्हा दाखल

नवीन नाशिक । प्रतिनिधी

अंबड परिसरातील घरकुल योजना येथे राहणाऱ्या अमर संदीप कांबळे यांच्या एक वर्षे सात महिन्यांच्या चिमुरडीचा मृत्यू डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. याप्रकरणी अंबड पोलिसांनी सीव्हिल हॉस्पिटलमधील जळीत वॉर्डातील संबंधित ऑन ड्युटी डॉक्टरांविरुद्ध भादंवि कलम ३०४ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

दि. १४ जून २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता माहेश्वरी अमर कांबळे हिच्या अंगावर गरम पाणी पडून छाती, पोट व हात भाजले. गंभीर अवस्थेत तिला जिल्हा शासकीय रुग्णालयातील जळीत वॉर्डात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी वेळेवर व योग्य उपचार न केल्यामुळे तिची प्रकृती खालावली आणि १६ जून २०२४ रोजी दुपारी बारा वाजता तिचा मृत्यू झाला. या प्रकरणाची चौकशी जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हास्तरीय तज्ञ समितीकडून करण्यात आली. चौकशीत डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्याचे निष्पन्न झाल्याने अमर कांबळे यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. सपोनि दिलीप भंडे यांच्या तपासात गुन्हा सिद्ध झाल्याने संबंधित डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीतून लोखंडी वायरची चोरी

नवीन नाशिक । कंपनीच्या उघड्या शटरमधून २० हजार रुपयांची लोखंडी वायरची चोरीची घटना घडली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रवीण इंद्रमनी सिंग (३४ रा. पाइपलाइन रोड, गंगापूर, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, अंबड औद्योगिक वसाहतीतील स्काय्पिंग कंपनी गाळा नंबर १० या ठिकाणाहून अज्ञात चोरट्यांनी लोखंडी वायरची गोणी कंपनीच्या उघड्या शटरमधून फिर्यादी यांच्या समतीशिवाय चोरून नेली. या प्रकरणी सिंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. वळसंगकर आत्महत्या; महिलेला पोलीस कोठठी

सोलापूर । वृत्तसंस्था

येथील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी महिलेला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. १८ एप्रिलला डॉ. वळसंगकर यांनी स्वत:वर बंदुकीच्या गोळ्या झाडल्या. आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी या महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायालयात महिलेचा हजर करण्यात आले. न्यायदंडाधिकारी दीपक कंखरे यांनी आरोपी महिलेस २३ एप्रिलपर्यंत कोठडी सुनावली आहे. कामावरून काढल्याने आरोपी मनीषा माने हिने डॉ. वळसंगकर यांना स्वत: आत्महत्या करण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत या महिलेच्या नावाचा उल्लेख करून तिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप केला होता.

खैरतस्कर प्रभूभाई गजाआड

वनविकास महामंडळाची वलसाडमध्ये कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

गुजरात-महाराष्ट्र सीमेवरील पेठ, सुरगाणा येथील जंगलात खैर या मौल्यवान वृक्षप्रजातीवर घाव घालून तस्करी करणारा सराईत नवसूभाई लोहार उर्फ पुष्पा याचा खास साथीदार संशयित प्रभूभाई रामदासभाई चावरा यास वनविकास महामंडळाच्या पथकाने अटक केली आहे. न्यायालयाने त्याला एक दिवसाची कोठडी सुनावून जामीन मंजूर केला आहे.

जिल्ह्यातील वनविभाग व वन विकास महामंडळाच्या वनक्षेत्रात मागील काळात अनेकवेळा खैरतस्करी करणाऱ्या या दोघांसह टोळ्यांना वनपथकाने अनेकदा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्यावर सीमावर्ती भागातील विविध वनपरिक्षेत्र कार्यालयांमध्ये वन अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या चावराचा शोध मागील सहा महिन्यांपासून घेतला जात होता; मात्र तो गुंगारा देत होता. तो चौकशीला हजर राहत नव्हता. तो गुजरातच्या वलसाड जिल्ह्यात आल्याची खात्रीलायक माहिती फिरते पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश बलैया यांना मिळाली. त्यांनी तत्काळ विभागीय व्यवस्थापक डॉ. सुजीत नेवसे, सहायक व्यवस्थापक प्रवीण डमाळे यांना दिली. त्यांनी त्वरित सापळा रचण्याचे आदेश दिले.

वनक्षेत्रपाल भरत तायडे, वनपाल हिरामण राऊत, चेतन चौरे, वनरक्षक के.पी.राठोड, अविनाश निकम, दीपक शिंगटे, नवीद सय्यद, सुनील बोरसे, मंगेश वाघ, वाहन चालक देविदास बांबले, पोलीस शिपाई बाजीराव चौधरी आदींनी घाव घेत तेथे वेशांतर करून सापळा रचला. चावरा यास शिताफीने जाळ्यात घेत न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्याच्यावर यापूर्वी दोन वन गुन्हे दाखल आहेत.

नाशिकरोडला घरफोडी; चार लाखांचे दागिने लंपास

नाशिकरोड । प्रतिनिधी

दोन वेगवेगळ्या घटनेत उपनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन घरफोड्या होऊन अज्ञात चोरट्यांनी सुमारे चार लाख रुपयांचे सोन्या,चांदीचे दागिने चोरून नेले.

याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात प्रियंका हडपे यांनी तक्रार दिली असून दि. १६ ते १८ एप्रिल या दरम्यान पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल जवळ असलेल्या ड्रीम रेसिडेन्सी फ्लॅट नंबर ८ जेलरोड, नाशिकरोड या ठिकाणाहून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील सुमारे दोन लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. त्यामध्ये एक लाख रुपयांचा राणीहार, एक लाख पंचवीस हजार किमतीचे मंगळसूत्रे व २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गोसावी हे करत आहे.

दुसऱ्या एका घटनेत वेदांत आनंदनगर परिसरात असलेल्या कदम लॉन्सजवळील ज्योत रेसिडेन्सी या ठिकाणाहून कुणीतरी अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील कपाटामध्ये असलेले सुमारे एक लाख तीस हजार रुपये किमतीचे सोन्या,चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी मनोज दौलत तेली यांनी उपनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या

दागिने ओरबाडले

नाशिक । बालिकेला दवाखान्यात घेऊन जात असताना दुचाकीवरून आलेल्या संशयित भामट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने खेचून नेल्याचा प्रकार घडला.

पूनम अमोल परदेशी (३५, रा. समर्थ कॉलनी, शांतीनगर, मखमलाबाद) यांनी तक्रार दिली आहे. शनिवारी (दि.१९) रात्री सव्वा आठच्या सुमारास त्या मुलीला डॉ. मुर्तडक यांच्याकडे घेऊन पायीच जात होत्या. राजकमल बंगल्याजवळ असताना पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या संशयिताने त्यांच्या गळ्यातील ४० हजारांची सोन्याची पोत बळजबरीने खेचून पोबारा केला. म्हसरुळ पोलिसात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला असून, उपनिरीक्षक पटारे हे तपास करीत आहेत.

फुलेनगरमध्ये तंबाखूमुळे हाणामारी

नाशिक । पंचवटीतील फुलेनगरमध्ये गयछाप तंबाखू घेतल्यानंतर पैसे परत न देता दुकानदाराने ग्राहकास रॉडने मारल्याचा प्रकार घडला. अनिल जाधव, ऐवन जाधव व एक साथीदार अशी संशयितांची नावे आहेत. नीलेश सुखदेव ढेंरेंगे (२६, रा. फुलेनगर, पंचवटी) यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवारी (दि. .१८) रात्री साडेदहाला ते तेलंगवाडीतील टपरीवर गायछाप पुडी घेण्यासाठी गेले. संशयित अनिल जाधवने नीलेशला पुडी दिली. उरलेले पैसे मागितले असता संशयितांनी त्यास शिवीगाळ करून दुखापत केली. पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल आहे.

पिंगळे फार्मजवळ मायलेकांना मारहाण

नाशिक । पेठरोडवरील पिंगळे फॉर्मजवळ संशयितांनी अडवून कोयता उगारून मायलेकांना मारहाण केल्याचा प्रकार घडला. दीपक शेवाळे, बाबू प्रमेश पगारे व दोन साथीदार अशी संशयितांची नावे आहेत. किरण सुभाष जाधव (४४, रा. लक्ष्मणनगर, पेठरोड) यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवारी (दि.१८) रात्री साडेआठला आई रंजना जाधव यांना दुचाकीवरून घेऊन जात असताना पिंगळे फॉर्मजवळ संशयित शेवाळे याने रोखले आणि 'तू नातवाईकांत बदनामी का करतो', असे म्हणत लोखंडी कोयता घेऊन अंगावर धाव घेतली. तर संशयित पगारे याने बेसबॉलच्या स्टीकने जाधव यांना मारहाण केली. रंजना जाधव ओरडत पळत असताना दोघा संशयितांनी त्यांनाही मारहाण केली. म्हसरुळ पोलिसात मारहाणीचा गुन्हा दाखल आहे.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

महिला व पुरुष पाहिजेत - Draftsman Part time ऑटोक्याड नॉलेज-१, ऑफीस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाईम-२, अकाऊंट पार्ट टाईम -१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ - एन. एन. असोसिएट्स, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्या वर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ : सकाळी १२ ते ५, संपर्क : 8668862801. (21/04-CM-52)

नाशिकरोड स्वामीराज लॉंजिंग कामासाठी मुले पाहिजे. मो. 8010880942 रुम ५९९ रु. उपलब्ध आहे. (20/04-BK-450)

भाड्याने देणे/घेणे

शॉन्दू विकणे
शॉन्दू विकणे
रु.25 शाट
- शॉन्दू -
9881 10000 / 9422011200

विकणे आहे

नवीन बांधकाम रोहाऊस विकणे आहे. औरंगाबाद रोड, निलगिरी बाग, मिरची हॉटेल जवळ स्वतंत्र बंगल्यासारखे असलेले कॉर्नरचे रोहाऊस विकणे आहे. (दोन टेरस व स्वतंत्र कार पार्किंग असलेले) (all inclusive negotiable price)- संपर्क- 8007411223. (18/04-CM-44)

कसबे सुकेणे-कोकणगाव रस्त्यालगत असलेली कसबे सुकेणे शिवारातील गट नंबर ११४५ बागायती शेती एक एकर द्राक्षबागेसह त्वरीत विक्री करणे आहे. संपर्कासाठी - अण्णासाहेब जाधव, मो. 8275585540. (20/04)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपचार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00556)

विवाह विषयक

वर पाहिजे गरीब कुटुंबातील मुलगी, वय - २७, शिक्षण - १२, भांड्यांच्या दुकानात काम करते, वेतन - १०,००० (जात-मराठा) मुलीला वडील नाही, अपेक्षा-कष्टाळू मुलगा हवा. 7709846590. (19/04)

नावात बदल

I have changed my name from THAKRE DURGA SHESHAN to new name DIPALI BHARAT JAIN CHORDIYA as per adhar No. 438350622681 (21/04)

I have changed my name from NAJMIN BEE SHAIKH HABIB to new name NAZMA BEE SHAIKH HABIB QURESHI as per PAN No. ABCPQ8378A (21/04)

- जाहिरात दर -
◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १५/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

नाठे मळ्यात वाहनाची चोरी

नाशिक । नाठे मळ्यातील रहिवासी नीलेश भाऊसाहेब साठे (२८) यांची १५ हजार रुपयांची दुचाकी २८ फेब्रुवारी ते ३ मार्च या दरम्यान राहत्या घरासमोर पार्क केली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

ठक्कर बाजार बसस्थानकात चोरी

नाशिक । ठक्कर बाजार बसस्थानकात बसमध्ये बसताना महिलेच्या पर्समधील सोन्याचे मंगळसूत्र चोरट्याने लंपास केल्याचा प्रकार घडला. कविता तुषार वेवले (३७, रा. एमएचबी कॉलनी, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि.१९) दुपारी बाराच्या सुमारास त्या नामपूरला जाण्यासाठी ठक्कर बाजार बसस्थानकावर कुटुंबीयांसह आल्या. त्यावेळी नाशिक-नामपूर बसमध्ये बसताना गर्दी झाली. चोरट्यांनी गर्दीची संधी साधून त्यांच्या पर्समधून ४५ हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. सरकारवाडा पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल आहे.

सरकारवाडा पोलीस ठाण्यात राडा

नाशिक । 'तक्रार दाखल केल्यानंतरही संशयितांना अटक का नाही केली' असा जाब विचारून दोघांनी सरकारवाडा पोलीस ठाण्यात येऊन गोंधळ घालत अंमलदारांची कॉलर पकडली. रोहित नरेंद्र बंब (२४), मोहित नरेंद्र बंब (दोघे रा. अशोक स्तंभ) अशी संशयितांची नावे आहेत. अंमलदार यादव तुकाराम शेवरे (५१) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि. १९) दुपारी पावणेचारच्या सुमारास ते कर्तव्यावर असताना संशयित पोलीस ठाण्यात आले आणि रोहित याच्या तक्रारीवरून दाखल गुन्हात संशयितांना अटक का केली नाही, यावरून पोलिसांना अपशब्द वापरत वैद्यकीय कागदपत्रांची मागणी केली. त्यावेळी पोलिसांनी समजावून त्यांना बाहेर जाण्यास सांगितले असता, संशयितांनी आरडाओरडा करुन शेवरे यांच्याशी हुज्जत घालत त्यांची कॉलर पकडली. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

पवार यांची ग्रंथसंपदा वारकऱ्यांना मोफत वाटणार : धोंगडे महाराज

नाशिक। जिल्ह्यातील प्रसिद्ध कीर्तनकार, संत साहित्याचे गाढे अभ्यासक वैकुंठवासी आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांची ग्रंथसंपदा वारकरी संप्रदायातील भावी पिढीला संस्मरणीय ठरावी, यासाठी आचार्य पवार यांची काही पुस्तके कीर्तनकारांना मोफत देण्याचे कार्य मागील काही दिवसांपासून संपत महाराज धोंगडे करत आहेत.

त्र्यंबकरोडवरील अंजनेरी येथे जगन्नाथ महाराज पवार यांचे संतधाम प्रतिष्ठान आहे. या प्रतिष्ठानचे उत्तरकार्य धोंगडे महाराज करत आहेत. संत तुकोबाराय व संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगावाणीवर वै. जगन्नाथ पवार यांची विशेष प्रभुत्व होते. नाशिकच्या वारकरी संप्रदायात त्यामुळे त्यांची स्वत:ची अशी एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. संत साहित्यामध्येदेखील त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांची विष्णू सहस्त्रनाम या ग्रंथाच्या अनेक आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. त्याचप्रमाणे संत निवृत्तीनाथांची सार्थ अभंग गाथा त्यांनी लिहिली आहे आजवर निवृत्तिनाथांची सार्थ अभंग गाथा खूप कमी लेखकांनी लिहिली आहे. त्यांचे 'आर्थिक ज्ञानराजा' हे पुस्तकदेखील प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्यांचे हे संत साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचावे, त्याचा प्रचार प्रसार होण्यासाठी यासाठी संपत धोंगडे प्रयत्नशील आहेत.

अंबड परिसरात सायकलस्वारास लुटले

नाशिक । अंबड परिसरातील नाल्याजवळ सायकलस्वाराला अडवून चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडील मोबाईल हिसकावून नेला. रोशन कृष्णप्रसाद (२२, रा. राजवाडा, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवारी (दि. ८) रात्री साडेसातच्या सुमारास तो एक्स्लो पॉइंटकडून रामकृष्णनगरकडे सायकलने जात असताना नाल्याजवळ पाठीमागून मोपेडवरून आलेल्या तिघांपैकी एकाने रोशनच्या पोटाला चाकू लावला आणि दुसऱ्याने त्याच्या खिशातील १० हजारांचा मोबाईल हिसकावून मारहाण करत पळ काढला. अंबड पोलिसात गुन्हा दाखल आहे. सहायक निरीक्षक दिलीप भंडे तपास करत आहेत.

देवळाली कॅम्पमध्ये महिलेस मारहाण

नाशिक । पोलिसांत केलेल्या तक्रारीवरून दमबाजी करणाऱ्या संशयिताने महिलेस मारहाण करीत विनयभंग केल्याचा प्रकार देवळाली कॅम्प येथे घडला. नितीन आहिरे (रा. देवळाली कॅम्प) असे संशयिताचे नाव आहे. पीडितेच्या फिर्यादीनुसार, १६ तारखेला रात्री सातच्या सुमारास संशयित घराच्या अंगणात असताना संशयित नितीनने त्यांना दमबाजी केली. त्यावेळी पीडितेने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता, संशयिताने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून विनयभंग केला. पीडितेचे वडील व भाऊ सोडविण्यास गेले असता, त्यांनाही मारहाण केली. देवळाली कॅम्प पोलिसात मारहाणीसह विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे.

पंचवटीत तरुणाची आत्महत्या

नाशिक । पंचवटीतील हनुमाननगरमध्ये घरात ३२ वर्षीय युवकाने गळफास लावून घेत आत्महत्या केली. प्रशांत लक्ष्मण कुशारे (३२, रा. हनुमाननगर) असे मृत युवकाचे नाव आहे. प्रशांतने शनिवारी (दि.१९) रात्री साडेसात -आठच्या सुमारास घरात नायलॉनने गळफास घेतला. शांताराम निमसे यांनी उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले असता, उपाध्यक्षपदी संदीप कुटे, सल्लागार म्हणून सुनील सपकाळ तर कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्ञानेच्चर गिरासे, संजय बाडिले, यशवंत अहिरे, अनिल शिंदे, नंदू माळी, प्रकाश भदाणे, राजेंद्र सोनार, सोनजे नाना पाटील यांची निवडी झाली. यावेळी वाहतूक विद्यार्थी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश पाटील तसेच ज्ञानेश्वर कडलग, बंटी कदम, अविनाश भगितकर, श्याम पाटील, राजेश पंचभाई, अनंत पाटील, धनंजय मुसळे, सतीश देवरे आदी उपस्थित होते.

विद्यार्थी वाहतूक सेना शाखा उद्घाटन

नवीन नाशिक । शिवसेना ठाकरे पक्षप्रणित विद्यार्थी वाहतूक सेनेच्या उंटवाडी, पेठे विद्यालय शाखेचे उद्घाटन उपनेते सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते झाले.

यावेळी उत्तर महाराष्ट्र प्रमुख अजीम सय्यद, संपर्कप्रमुख देवानंद बिरारी उपस्थित होते. वाहतुकीचे तसेच वाहतूकदारांचे प्रश्न शिवसेनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी तसेच वाहतूकदारांच्या कुटुंबीयांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आवाहन उपनेते सुधाकर बडगुजर यांनी केले. पेठे विद्यालय शाखा अध्यक्षपदी सखाराम कासव, उपाध्यक्षपदी संदीप कुटे, सल्लागार म्हणून सुनील सपकाळ तर कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्ञानेच्चर गिरासे, संजय बाडिले, यशवंत अहिरे, अनिल शिंदे, नंदू माळी, प्रकाश भदाणे, राजेंद्र सोनार, सोनजे नाना पाटील यांची निवडी झाली. यावेळी वाहतूक विद्यार्थी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश पाटील तसेच ज्ञानेश्वर कडलग, बंटी कदम, अविनाश भगितकर, श्याम पाटील, राजेश पंचभाई, अनंत पाटील, धनंजय मुसळे, सतीश देवरे आदी उपस्थित होते.

वाचकांना विनम्र सूचना
'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.
या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै. देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆ नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, विटको पॉइंट. ०२५३-२२६२७५६ ◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॉपडशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆ दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆ मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆ सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.